**<u>ठळक बातम्या</u>**

- आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

- ग्रीनलँडवर अमेरिकेच्या वर्चस्वाला विरोध दर्शवणाऱ्या ८ युरोपियन देशांवर पुढच्या महिन्यापासून १० टक्के आयात शुल्क लागू करण्याची डोनाल्ड ट्रंप यांची घोषणा

- भाजपाचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचं निधन

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाचं भूमीपूजन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. नगाव जिल्ह्यात कालियाबोर इथं झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी कालियाबोरचं ऐतिहासिक महत्त्व सांगितलं. काझीरंगा मधे एकशिंगी गेंड्यांची शिकार होता कामा नये याकरता आपलं सरकार दक्ष असल्याचं ते म्हणाले. जैवविविधता आणि निसर्गसंवर्धनासाठी ओळखलं जाणारं काझीरंगा अभयारण्य भारताचा महान वारसा आहे असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट...**

आसाम चे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा आणि भाजपा खासदार कामाख्या प्रसाद तासा कार्यक्रमाला उपस्थित होते.

प्रधानमंत्री सध्या आसाम आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असून ३ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचं त्यांनी

काल उद्घाटन केलं.मालदा रेल्वे स्थानकातून हावडा, आणि गुवाहाटीमधील कामाख्या दरम्यान धावणाऱ्या, देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला आणि त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांनाही त्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला.

आज  कोलकाता इथं नव्या दोन अमृत भारत जलद रेल्वे गाड्यांना प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवणार आहेत. तसंच सिंगूर इथं आज ८३० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उदघाटनही होणार आहे.

**<><><><>**

परकीय गुंतवणूदारांनी भारतीय शेअर बाजारातून या महिन्यात २२ हजार ५३० कोटी रुपये काढून घेतल्याचं ठेवीदाराच्या आकडेवारीत म्हटलं आहे. तसंच परकीय गुंतवणुकदारांनी भारतीय कर्ज रोख्यात गुंतवलेले ५ हजार १४३ कोटी रुपयेही काढले आहेत. दरम्यान, तीन महिने सलग गुंतवणूक काढून घेतल्यानंतर परकीय गुंतवणुकदारांनी ऑक्टोबर महिन्यात १४ हजार ६१० कोटी रुपये गुंतवले होते.

**<><><><>**

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याकरता नवी दिल्ली सज्ज झाली आहे. या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होणार आहे.

महाराष्ट्राच्या वतीने  'गणेशोत्सव आत्मनिर्भरतेचे प्रतीक या संकल्पनेतून साकारलेल्या भव्य चित्ररथाचे संचलन यावेळी होणार आहे. या चित्ररथातून

राज्याची पंरपरा आणि अर्थव्यवस्थेचं दृष्य साकारलं जाणार आहे. अशी माहिती संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी दिली.

यंदा प्रथमच 'बॅटल ॲरे' या युद्ध रचनेचं प्रदर्शन होणार असून अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे चित्तथरारक दर्शन घडवले जाईल. संचलनात लष्कराच्या १८ तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील.

**<><><><><>**

ग्रीनलँड वर अमेरिकेच्या वर्चस्वाला विरोध दर्शवणाऱ्या ८ युरोपियन देशांवर येत्या फेब्रुवारीपासून १० टक्के आयात शुल्क लागू करणार असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केलं आहे. डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड किंग्डम, नेदरलँड्स आणि फिनलंड या देशांना हा कर लागू होईल, तसंच ग्रीनलँडवर ताबा मिळवण्याबाबत कोणताही करार झाला नाही, तर १ जून पासून हा कर २५ टक्क्यांपर्यंत वाढवला जाईल, असं ट्रम्प यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

युरोपीय नेत्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ग्रीनलँडवरच्या प्रस्तावित करांचा निषेध केला आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे दोन्ही देशांमधले संबंध बिघडतील आणि धोकादायक परिस्थिती निर्माण होईल, असा इशारा युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी एका संयुक्त निवेदनाद्वारे दिला आहे. प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्व ही आंतरराष्ट्रीय कायद्याची मूलभूत तत्त्व असून, आंतरराष्ट्रीय कायद्याचं रक्षण करण्यासाठी युरोपियन युनियन संयुक्त प्रतिसाद देण्याच्या तयारीत असल्याचं यात म्हटलं आहे. फ्रान्स, आणि स्वीडन सह इतर युरोपियन देशांनी या निवेदनाला पाठिंबा दर्शवला आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या योजनेला ग्रीनलँड आणि

डेन्मार्कनं तीव्र विरोध दर्शवला असून, कोपनहेगन, आरहस, आल्बोर्ग आणि ओडेंस सह इतर शहरांमध्ये हजारो नागरिकांनी  रस्त्यावर उतरून निदर्शनं केली.

**<><><><><>**

युरोपियन युनियन आणि 'मर्कोसुर' या दक्षिण अमेरिकन व्यापार गटात काल पॅराग्वेची राजधानी असुनसिओन इथं मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी झाली. या करारामुळे जगातल्या सर्वात मोठ्या व्यापार क्षेत्रांपैकी एक क्षेत्र निर्माण झालं असून, या करारा अंतर्गत  अर्जेंटिना, ब्राझील, पॅराग्वे आणि उरुग्वेसह युरोपियन युनियन आणि मर्कोसुर देशांदरम्यानच्या व्यापारात  ९० टक्क्यांपेक्षा जास्त कर कपात केली जाईल. मात्र काही वस्तूंवरच्या आयात शुल्कात येत्या १० ते १५ वर्षांमध्ये टप्प्याटप्प्यानं कपात केली जाईल.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य सरकारमधले माजी मंत्री  आणि ज्येष्ठ भाजपा नेते राज पुरोहित यांचं यांचं आज निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्यावर मुंबईतल्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते, उपचारादरम्यान त्यांचं आज सकाळी निधन झालं.

पुरोहित यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवकपदापासून केली. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत आमदार आणि राज्य सरकारमधे त्यांनी मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली. तसंच ते काही काळ भाजपाचे मुंबई अध्यक्षही होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी मिळाली नाही. नुकत्याच झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेत त्यांचे पुत्र आकाश पुरोहित हे निवडून आले आहेत.

भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी पुरोहित यांना श्रद्धांजली वाहिली. पुरोहित यांचा तळागाळातल्या लोकांशी संपर्क होता, त्यांच्या निधनामुळे राज्याने एक अनुभवी नेता गमावला आहे, असं तावडे म्हणाले. राज पुरोहित यांनी कुलाबा आणि मुंबादेवी मतदारसंघाच्या प्रगतीसाठी दिलेलं योगदान सदैव स्मरणात राहील,

असं भाजपा नेते आणि मंत्री आशीष शेलार यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. पुरोहित यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी मुंबईतल्या त्यांच्या निवासस्थानी ठेवलं होतं. चंदनावाडी इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><>**

'नासा', या अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्थेने, आपलं नवीन शक्तिशाली चांद्र-यान प्रक्षेपकापर्यंत पोहोचवलं आहे. हे यान अंतराळवीरांना घेऊन चंद्रप्रदक्षिणा करणार आहे. ३२२ फूट लांबीचं एसएलएस, म्हणजेच स्पेस लाँच सिस्टम- रॉकेट काल फ्लोरिडामधल्या केनेडी स्पेस सेंटरमधून लाँच पॅडवर नेण्यात आलं.
फेब्रुवारीच्या सुरुवातीला हे यान चार अंतराळवीरांना चंद्राच्या कक्षेत घेऊन जाईल आणि १० दिवसांच्या प्रवासानंतर परत येईल. काही तांत्रिक कारणांमुळे यानाचं प्रक्षेपण अनेक वर्ष होऊ शकलं नाही. या अभियानात अंतराळवीर चंद्रावर उतरणार नाहीत, मात्र भविष्यात ही गोष्ट साध्य करण्याच्या दृष्टीनं ही मोहीम महत्त्वाची समजली जात आहे.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंडदरम्यान तिसरा आणि अखेरचा एकदिवसीय क्रिकेट सामना आज इंदूर इथं सुरु झाला आहे. नाणेफेक जिंकून भारताने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत आहेत. शेवटची बातमी मिळाली तेव्हा न्यूझीलंडच्या एका षटकात १ गडी बाद ५ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं उद्यापासून जागतिक आर्थिक मंचाची परिषद सुरु होत असून, त्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. २३ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत ३ हजारापेक्षा जास्त जागतिक नेते सहभागी

होणार आहेत. त्यासाठी ५ हजारापेक्षा जास्त सुरक्षा रक्षक, स्नायपर्स, एआय-चालित ड्रोन, हवाई क्षेत्रावर निर्बंध आणि हेरगिरीविरोधी यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. ‘अ स्पिरिट ऑफ डायलॉग’ ही यंदाच्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेची संकल्पना आहे.

**//<><><><><>//**